**ठळक बातम्या**

- व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी शिक्षण अत्यावश्यक असून संवेदनशील शिक्षक या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
- देशातल्या ६६ शिक्षकांना राष्ट्रीय पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान
- ईद ए मिलाद निमित्त देशभरात विविध कार्यक्रम
- प्रसिद्ध फॅशन डिझायनर आणि आर्मानी या कपड्यांच्या ब्रँडचे मालक जॉर्जिओ आरमानी यांचं निधन

**आणि**

- आशिया चषक हॉकी स्पर्धेत भारताचा मलेशियावर विजय

**<><><><><>**

अन्न, वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजांप्रमाणेच शिक्षण हे व्यक्तीचा स्वाभिमान आणि संरक्षणासाठी अत्यावश्यक असून संवेदनशील शिक्षक या भावना विद्यार्थ्यांमध्ये रुजवतात, असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज केलं. शिक्षकदिनाच्या निमित्ताने, नवी दिल्लीतल्या विज्ञान भवनात राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार वितरण सोहळ्यात त्या बोलत होत्या. या पुरस्कारविजेत्या शिक्षकांमध्ये शिक्षिकांची, तसंच ग्रामीण भागातल्या शिक्षकांची संख्या लक्षणीय आहे, याचा आवर्जून उल्लेख राष्ट्रपतींनी केला. उपेक्षित वर्गांतली मुलं शिक्षणाच्या जोरावर यशाची शिखरं गाठू शकतात आणि त्यांच्या या भरारीला बळ देण्यात प्रेमळ आणि निष्ठावंत शिक्षकांची भूमिका सगळ्यात महत्त्वाची असते, असं राष्ट्रपतींनी नमूद केलं. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातल्या तरतुदींचा उल्लेख करून स्मार्ट फळा, स्मार्ट वर्गखोल्यांबरोबरच स्मार्ट शिक्षक सर्वात महत्त्वपूर्ण आहे, अशी ग्वाही राष्ट्रपतींनी दिली. मुलींच्या शिक्षणातली गुंतवणूक ही कुटुंब, समाज आणि देशाच्या उभारणीत

अनन्यसाधारण भूमिका बजावते, असं प्रतिपादन त्यांनी केलं. आधुनिक भारताच्या उभारणीत सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करताना त्या म्हणाल्या,

***होल्ड... बाईट- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू (१३ सेकंद)***

गेल्या काही वर्षांत उच्च शिक्षण, तसंच स्टेम, अर्थात विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि गणित या क्षेत्रांमध्ये मुलींचा सहभाग वाढत असल्याचं त्यांनी सांगितलं. शिक्षकांच्या योगदानाच्या बळावर भारत जागतिक पातळीवर ज्ञानाचं भांडार म्हणून उभा राहील, असा विश्वास राष्ट्रपतींनी

व्यक्त केला. यावेळी राष्ट्रपतींनी देशातल्या ६६ शिक्षकांना उत्कृष्ट कार्याबद्दल पुरस्कार प्रदान केले. **नांदेडचे** डॉ शेख मोहम्मद वकीउद्दीन शेख हमीउद्दीन, **लातुरचे** डॉ.सांदिपान गुरुनाथ जगदाळे, **मुंबईच्या** डॉ .नीलाक्षी सुभाष जैन आणि **बारामतीचे** प्रा. पुरुषोत्तम बाळासाहेब पवार या **महाराष्ट्रातल्या** शिक्षकांचा पुरस्कार विजेत्यांमध्ये समावेश आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी आणि इतर यावेळी उपस्थित होते.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. व्यक्तीमत्वांची जडणघडण करण्यासाठीचा शिक्षकांचा समर्पण भाव म्हणजे अधिक मजबूत आणि उज्ज्वल भविष्याचा पाया असल्याचं त्यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. शिक्षकांमधली वचनबद्धता आणि करुणाभाव कौतुकास्पद असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्र्यांनी थोर विचारवंत आणि शिक्षक दिवंगत डॉ. एस. राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या जीवनकार्य आणि विचारांचंही स्मरण केलं आहे.

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनीही शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. शिक्षकवर्ग समर्पण भावनेनं देशाच्या विकासात महत्वाचं योगदान देत आहे, असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ओणम सणाच्या निमित्तानं नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. ओणम हा केरळच्या समृद्ध सांस्कृतिक वारसा आणि परंपरेचं अनोखं उदाहरण असून, हा देशाच्या शेतकऱ्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा सण असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

हा सण सर्वांच्या जीवनात आनंद, उत्तम आरोग्य आणि समृद्धी घेऊन येवो, अशी आशा प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशातून व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कराच्या रचनेत फेरबदल करण्याचा निर्णय नुकताच जीएसटी परिषदेनं घेतला. त्यात आता फक्त २ स्तरांवर करआकारणी होणार आहे. अन्नपदार्थांवरच्या कराच्या दराची अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ….

**व्हॉईस कास्ट- आशुतोष सावे**

जीएसटी करांच्या पुनर्चरनेमुळे कर आकारणीत सुटसुटीतपणा आला आहे तसंच अनेक गरजेच्या वस्तूंवरचा कर कमी झाल्यानं त्या स्वस्त होतील. टेट्रापॅकमधे मिळणारं अतिउष्ण तापमानावर उकळलेलं दूध, तूप, पाश्चराईज्ड बटर, चीझ, ब्रेडस्प्रेड्स, कंडेन्स्ड मिल्क यांच्यावर पूर्वी १२टक्के दराने कर आकाला जात होता तो आता ५ टक्के झाला आहे. पॅकबंद पनीरवर पूर्वी १२ टक्के जीएसटी होता तो आता पूर्णपणे काढून टाकण्यात आला आहे. याखेरीज सुकामेवा, खजूर, संत्री, मांदारिन सारक्या रसयुक्त फळांचे  वाळवलेले तुकडे यावरही आता १२

टक्क्यांऐवजी ५ टक्के कर आकारला जाईल. एकूणच पोषण आहाराच्या दृष्टीनं आवश्यक अन्नपदार्थ आता स्वस्त होतील, ऐकूया यावर एका गृहिणीची प्रातिनिधिक प्रतिक्रीया...

**बाईट-.आरती आपटे**

**<><><><><>**

महाराष्ट्रात गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची उद्या अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेश विसर्जनानं सांगता होणार आहे. गणेश विसर्जन सोहळ्यासाठी मुंबई पुण्यासह ठिकठिकाणच्या स्थानिक प्रशासनानं सुरक्षा, स्वच्छता, आरोग्य आणि पर्यावरणपूरक व्यवस्थेची काटेकोर आखणी केली आहे. ठिकठिकाणी विसर्जनासाठी कृत्रिम तलावांची व्यवस्था करण्यात आली असून अनेक ठिकाणी मूर्तीदानाचा उपक्रम राबवण्यात येणार आहे. वाहतुकीचं नियमन करण्यात येत असून सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे.

विसर्जन मिरवणुकांच्या पार्श्वभूमीवर ईद ए मिलाद निमित्तची शोभायात्रा येत्या सोमवारी काढण्याचा निर्णय मुस्लिम समाजाने घेतला आहे.

दक्षिण मुंबईतल्या बाणगंगा तलावात पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचं विसर्जनाची परवानगी द्यायला उच्च न्यायालयानं काल नकार दिला. सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या पर्यावरणपूरक गणेश मूर्तींचं विसर्जन नैसर्गिक जलस्रोतामध्ये करण्यांसंबंधीची मार्गदर्शक तत्वं राज्य सरकारने प्रसिद्ध केली होती. मात्र, बाणगंगा तलावात विसर्जन करू दिलं जात नसल्याबद्दल एका स्थानिक रहिवाशाने याचिका दाखल केली होती. प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती आरती साठे यांच्या पीठासमोर काल या याचिकेची सुनावणी झाली. पीओपी मूर्ती विसर्जनासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नियम तयार केले आहेत. यात शाडू मूर्तींचा समावेश केलेला नाही. मात्र बाणगंगा संरक्षित स्थळ असल्यानं तिथे गणेशमूर्ती विसर्जनाला परवानगी नसल्याचे आदेश पुरातत्व

विभागाने महापालिकेला दिल्याचा युक्तिवाद महाधिवक्ता बीरेंद्र सराफ यांनी केला. हा युक्तिवाद मान्य करून मुंबई उच्च न्यायालयाने बाणगंगा तलावात मूर्ती विसर्जनासाठी परवानगी द्यायला नकार दिला.

**<><><><><>**

ईद मिलाद उन नबी अर्थात प्रेषित महंमद यांचा जन्मदिवस आज देशभरात साजरा होत आहे. इस्लामी हिजरी दिनदर्शिकेनुसार प्रेषित महंमदांची ही पंधराशेवी जयंती असल्यामुळे यावर्षी या सणाला आणखी महत्त्व आहे. त्यांचं आयुष्य आणि शिकवण अधोरेखित करण्यासाठी आज ठिकठिकाणी मिलाद मैफिली आणि सीरत परिषदांचं आयोजन करण्यात आलं आहे, तसंच ठिकठिकाणी मिरवणुका काढण्यात येत आहेत.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मिलाद-उन-नबीच्या निमित्तानं शुभेच्छा दिल्या आहेत. प्रेषित मोहम्मद यांनी मानवता, एकता आणि सेवेचा संदेश दिला असल्याचं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. या पवित्र सणाच्या निमित्तानं सर्व नागरिकांनी प्रेषित मोहम्मद यांच्या शिकवणीतून प्रेरणा घेत, बंधुत्वाच्या  भावनेनं पुढे जाण्याचा संकल्प करावा असं आवाहनही त्यांनी केलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही हा सण समाजात शांती आणि कल्याण घेऊन येवो, अशी आशा व्यक्त केली आहे.  करुणा, सेवा आणि न्याय ही  मूल्ये नेहमीच सर्वांना मार्गदर्शन करत राहतील अशी आशा त्यांनी आपल्या संदेशातून व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

आशिया कप हॉकी चॅम्पियनशिप स्पर्धेच्या सुपर फोर फेरीत भारतानं मलेशियावर ४-१ अशी मात केली. पहिल्या क्वार्टरमधली पिछाटी भरून काढत

भारतानं सामन्यावरची पकड शेवटपर्यंत टिकवून ठेवली. मनप्रीत सिंह, सुखजीत सिंह, शीलानंद लकरा आणि विवेक सागर प्रसाद या चौघांनी प्रत्येकी एक गोल केला. आता भारताचा पुढचा सामना उद्या चीनविरुद्ध होणार आहे.

<><><><><>

प्रसिद्ध फॅशन डिझायनर आणि आर्मानी या कपड्यांच्या ब्रँडचे मालक जॉर्जिओ आरमानी यांचं काल वयाच्या ९१व्या वर्षी निधन झालं. त्यांच्या ब्रँडनं समाजमाध्यमावरच्या पोस्टद्वारे ही माहिती दिली. आर्मानी ब्रँडचं नाव सौंदर्यप्रसाधनं, अत्तर, संगीत, क्रीडा, हॉटेल्स अशा विविध क्षेत्रांमध्ये प्रसिद्ध आहे.

<><><><><>

भारतीय हवामान विभागानं गुजरातसाठी आज अतिवृष्टीचा रेड अलर्ट जारी केला आहे. राजस्थान, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, सौराष्ट्र-कच्छ आणि मध्य प्रदेशातही मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. उत्तराखंड, हरयाणा, चंदीगढ आणि  पश्चिम बंगाल मधल्या हिमालयीन भागासह देशातल्या अनेक भागांत जोरदार पावसाची शक्यता आहे. जम्मू-काश्मीर, लडाख, गिलगिट-बाल्टिस्तान, मुजफ्फराबाद, बिहार, हिमाचल प्रदेश आणि तेलंगणा इथे वादळी वाऱ्यांसह विजा आणि पावसाचा इशारा देण्यात आला आहे. अंदमान-निकोबार बेटे, झारखंड, मराठवाडा, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकल या भागांमध्येही अशीच परिस्थिती राहील, असं हवामान विभागानं म्हटलं आहे. दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रामध्येही दिवसभर मुसळधार पाऊस पडेल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

<><><><><>

अफगाणिस्तानच्या आग्नेय भागात काल ६ पूर्णांक २ दशांश रीख्टर तीव्रतेचा भूकंप झाला. रविवारी झालेल्या भूकंपापेक्षाही हा मोठा भूकंप असल्याचं तालिबानच्या प्रवक्त्याने म्हटलं आहे. पाकिस्तान सीमेजवळील दुर्गम शिवा जिल्ह्यात भूकंपाचे केंद्र होते. दरम्यान बचाव कार्यासह ढिगाऱ्याखालून मृतदेह बाहेर काढण्याचं काम

सुरू असून भूकंपग्रस्त भागात अन्न, निवारा आणि वैद्यकीय मदतीची कमतरता असल्याने मदत संस्थांनी मानवीय संकट निर्माण होण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे एकंदर मृतांचा आकडा २२०० हून अधिक झाला आहे.

**//<><><><><>//**